महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत
(CIN No. U40109MH2005SGC153646)

कार्यकारी अभियंता,
अति उच्च दाब संवसु विभाग
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत.
मिरजोळे रोड.एम.आय.डी.सी.रत्नागिरी ४१५ ६३९
दुरध्वनी क्रमांक ०२३५२– २३१३८८ (का.)
फॅक्स नंबर ०२३५२ – २२८००३ (फॅक्स)
E-mail – eeratnagiri@gmail.com
Website : www.mahatranco.in

जावक क्र.काअ/अउदा संवसु विभाग/रत्ना/मासं/ № 0 0 0 7 4 दिनांक : 12 JAN 2024

## जाहीर सुचना

महापारेषण अउदा संवसु विभाग, रत्नागिरी अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाऊ उमेदवार म्हणुन सन २०२४ – २०२५ करीता वीजतंत्री (Electrician) या ट्रेडमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या **www.apprenticeshipindia.org** या संकेत स्थळांवर महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादित, अउदा संवसु विभाग, रत्नागिरीच्या खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकावर **दि. १३.०१.२०२४** पासुन ऑनलाईन अर्ज सादर करणे गरजेचे आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची **अंतिम मुदत दि. ०२.०२.२०२४ पर्यत** राहिल. त्यानंतर प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जाचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. वीजतंत्री (Electrician) शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा शासनाच्या नियमानुसार ०१ वर्षाचा राहिल. ऑनलाईन अर्जासाठी आवश्यक माहिती खालील प्रमाणे आहे.

| आस्थापनेचा रजिस्ट्रेशन क्रमांक | ट्रेड | एकुण |
|---|---|---|
| E01172700218 | वीजतंत्री (Electrician) | एकुण जागा – २२ |

१. शैक्षणिक अर्हता – महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतुन वीजतंत्री या व्यवसाय परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२. विदयावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागु राहिल.

३. पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व निर्णय घेण्याचे अधिकार व्यवस्थापनेकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनेस बंधनकारक रहाणार नाही.

४. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी आरक्षण शासनाच्या विविध नियमानुसार लागु राहिल.

५. ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे याची पडताळणी करुन माहिती भरावी.

६. एस.एस.सी.गुणपत्र/प्रमाणपत्र व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्र/प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.

७. शिकाऊ उमेदवारांची सही, पालकांची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी.मार्क, आयटीआय मार्क, ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवाराचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

८. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमदवाराने राजकीय किंवा इतर अधिका–कडुन दबाव आणल्यास संबंधीत उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

९. शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्राची सुस्पष्ट स्कॅन करुन योग्य रितीने ऑनलाईन (Online) अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१०. वयोमर्यादा १८ ते ३० वय वर्षे (मागासवर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथिलक्षम).

११. ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सदयस्थितीत कार्यान्वित असणारा E-Mail ID व भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. E-Mail ID व भ्रमणध्वनी क्रमांक कार्यान्वित नसल्यामुळे संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पुर्ण जबाबदारी उमेदवारावर राहिल.

१२. दि.०२.०२.२०२४ नंतर ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१३. आरक्षणाचा लाभ घेणा—या उमेदवारांना ऑनलाईन अर्जा सोबत जाती प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्यास शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणा संबंधीत कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहिल.

१४. शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१५. निवड केलेल्या उमेदवारांनी जिल्हाशल्यचिकित्सक यांच्याकडुन वैदयकीय दृष्टया सक्षम असल्याचा दाखला देणे बंधनकारक आहे.

१६. कागदपत्रे तपासणी किंवा शिकाऊ उमेदवार म्हणुन हजर होण्याकरीता कोणत्याही रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यात येणार नाही.

१७. शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये कंपनीकडुन कोणतीही निवासव्यवस्थेची मागणी करता येणार नाही.

(रुपेश गायकवाड)
कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.पा.कं.मर्यादित,
अउदा संवसु विभाग, रत्नागिरी.

Scanned with OKEN Scanner